ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS

Original Research Article

महिला सबलीकरण व महिलांची सद्यस्थिती

*प्रा. डॉ. एस. एस. देवनाळकर व **लता रंगराव माने

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर.

**संशोधक विद्यार्थीनी, पिपल्स कॉलेज, नांदेड

प्रस्तावना:

भारतात महिला अजूनही दुय्यम स्थानावर आहेत. त्या आर्थिक सामाजिकदृष्ट्या दुर्बल तसेच निर्भर आहेत पण वर्तमान स्थितीत स्त्रियांमध्ये शिक्षण व तत्सम कारणामुळे जागरूकता वाढत चालली आहे. त्यामुळे स्त्री सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा विचार गांभीर्याने करणे गरजेचे आहे.

अंधाराच्या फलकावर - प्रकाशाचा वेध घे।
सामर्थ्याच्या शस्त्राला - अस्मितेची धार दे।
दास्याच्या शृंखलांना - विवेकाने सार दे।
परंपरेच्या वेदनांना - कंठामधून वाट दे।
उद्याच्या भगिनींना - स्वातंत्र्याची भेट दे।

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाचा आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने निभावट आहेत. असे असले तरी जगाच्या पाठीवर ब-याच ठिकाणी समाजाकडून, शैक्षणिकदृष्ट्या, आर्थिक, व्यावसायिक, आरोग्यविषयक दुर्लक्ष होताना दिसते. महीलांच्या विकासाबाबत सामाजिक असमानता दिसून येत आहे. महिला अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. अनादी काळापासून महिलांवरील अनावश्यक बंधने, त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाच्या आड येत आहेत. सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा, अत्याचार आणि आर्थिक परावलंबित्व यातून स्त्रियांची सुटका व्हायची असेल तर गरज आहे महिला सबलीकरणाची. महिलांना प्रथमतः जाणीव करून दिली पाहीजे की, आपण सक्षम आहोत याची खात्री महिलांनी बाळगणे गरजेचे आहे. महीला सबलीकरणातून महिलांना भौतिक असो वा आध्यात्मिक, शारीरिक किंवा मानसिक अशा सर्व स्तरांवर आत्मविश्वास निर्माण करून महिलांना सक्षम बनविले पाहीजे.

1961 मध्ये मातृत्व लाभ कायदा, 1976 चा समाज मोबदला कायदा, 2013 मध्ये प्रतिबंध आणि संरक्षण कायदा असे काही विशिष्ट कायदे भारतीय संसदेने महीलांच्या हक्कांच्या संदर्भात मंजूर केले.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

महीला सबलीकरण म्हणजे काय?

- स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व वैचारिक पातळ्यांवर समानता प्रदान करणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय.
- महीला सबलीकरण म्हणजे महिलांचा अंगभूत क्षमतांचा विधायक विकास होणे होय.
- It is impossible to think about the welfare of the world unless the condition of women is improved. It is impossible for a bird to fly on only one wing - Swami Vivekanand.
- थोडक्यात महिला सबलीकरण म्हणजे त्यांना त्यांच्या विकासासाठी स्वातंत्र्याची समान संधी असणे होय.

महीला सबलीकरण व महिलांची सद्यस्थिती :

भारतीय राज्यघटनेच्या अंतर्गत महिलांच्या हक्कांमध्ये प्रामुख्याने समानता, प्रतिष्ठा आणि भेदभावापासून स्वातंत्र्य समाविष्ट आहे.

1) शैक्षणिक क्षेत्रात महीलांची सद्यस्थिती :

सुशिक्षित स्त्री हे समाजाला मिळालेले वरदान आहे. स्त्रियांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास व परिपोषण करणारे महत्त्वाचे साधन म्हणजे शिक्षण होय. स्त्री शिक्षण हा कोणत्याही समाजजीवनाच्या समृद्धीचा आणि प्रगतीचा मापदंड आहे. कोणत्याही समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, त्यावरून ठरते. नैतिक मूल्यांचे शिक्षणांची तत्संबंधी शिस्त आणि नियमनाची जबाबदारी पालक म्हणून स्त्रीया महत्त्वाची भूमिका सांभाळत असतात. आपल्या पाल्यास अभिव्यक्त होण्यासाठी प्रोत्साहित करणे स्वतःकरिता चांगले काय आणि वाईट काय हे ठरविण्याची निर्णयक्षमता निर्माण करण्याकरिता पालक म्हणून पाल्यांची जबाबदारी स्वीकारतात.

1951 च्या जनगणनेत महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण फक्त 8.86% होते. 2001 च्या जनगणनेत महिलांचे शिक्षणाचे प्रमाण 65.46% आहे. महाराष्ट्रातील सुसंस्कृत व सुशिक्षित पेशव्यांच्या पुण्यात ज्योतिराव फुले यांनी आपल्या पत्नि समवेत स्त्रिशिक्षणाचे उचललेले पाऊल फारच महत्त्वपूर्ण ठरले. शिक्षण हे स्त्रिला सर्वार्थाने सक्षम, सुक्षिक्षित व सुसंस्कृत बनवू शकते असे प्रबोधन व पूर्ण विश्वास समाजात रूजविले.

2) आर्थिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात महीला ह्या पूर्णतः पुरूषावर अवलंबून असायच्या. म्हणजेच लहान वयात वडीलांवर, विवाहानंतर पतीवर आणि वृद्ध झाल्यावर मुलांवर अवलंबून असायच्या. पुरूषाने आर्थिक कामे करावी, महिलांनी चूल आणि मूल सांभाळावी अशी समाजाची अपेक्षा होती. परंतु स्त्रिया आज स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनत आहेत. ती आज उच्च शिक्षण घेऊन अर्थार्जन करीत आहेत. आजच्या प्रशासकीय, वैद्यकीय, पोलीस प्रशासन, न्यायालयीन व्यवस्था, उद्योग आणि व्यापार अशा सर्वच ठिकाणी त्या दिसून येत आहेत. महिला आज स्वतंत्र व आत्मनिर्भर असल्याने त्या कोणावरही अवलंबून नाहीत.

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025
OPEN ACCESS Original Research Article

3) सामाजिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

समाजात महिलांचे महत्त्व असूनही महिलांना असंख्य आव्हानांचा सामना करावा लागतो. समाज निर्माण करण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण महत्त्वाचे ाहे. भारताचे राष्ट्रपती, भारताचे प्रधानमंत्री, लोकसभेचे अध्यक्ष अशा पदावर अनेक महिलांनी भारत सरकारमधील विविध वरिष्ठ पदावर काम केले आहे. भारतीय संविधानाने सर्व भारतीय महिलांना समानतेची हमी दिली. म्हणजेच महिला सामाजिक बंधनातून मुक्त होताना दिसून येतात.

बंगालमध्ये समाजसुधारणेच्या माध्यमातून राजा राममोहन रॉय यांनी महिला सबलीकरणाला वाचा फोडली. त्यांनी हिंदू धर्मातील अनेक बुरसटलेल्या रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती स्त्रियांच्या क्षमतांना कशा प्रकारे निर्बंधीत करतात हे दाखवून दिले. स्त्रियांना धर्माच्या व अंधश्रद्धाच्या नावाखाली समाजाकडून मिळणारी क्रूर व हिंसक वागणूक, स्त्रियांवर होणारे अत्याचार या विरोधात कायदे केले आणि महिलांना सक्षम बनविले. समाजाच्या पुनर्रचनेचे सुत्र म्हणून शिक्षण + समता + न्याय = सबलीकरण असे म्हणता येईल. हे त्रिसुत्री समीकरण स्त्री सबलीकरणाची आणि समाजाची समता प्रस्थापित करण्याची बेरीज आहे.

'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' असा ईशारा बाबासाहेबांनी समाजाला दिला. दलित महिलांच्या सबलीकरणामध्ये बाबासाहेबांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी स्त्रियांना हिंदू कोड बीलाद्वारे अवकाश मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

4) कौटुंबिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात भारतामध्ये प्रामुख्याने संयुक्त कुटूंब पद्धती होती. या संयुक्त कुटूंबामध्ये पुरूषाची सत्ता होती. परंतु आज भारतामध्ये संयुक्त कुटूंबाचे विघटन होऊन त्यांची जागा विभक्त कुटूंबाने घेतली आहे. या कुटूंबात आता तिची भूमिका दासीसारखी न राहता ती कुटूंबप्रमुखाची सहचारी बनत चालली आहे. ती आज कुटूंबातील सर्वच निर्णयप्रक्रियेत भाग घेत आहे. स्त्री-पुरूष भेदभाव नष्ट होताना दिसून येत आहेत. पुरूषाप्रमाणे महिलांना कुटूंबात व समाजात समान अधिकार दिले जातात.

5) व्यावसायिक क्षेत्रात महिलांची सद्यस्थिती :

महिलांनी चूल आणि मूल याकडेच लक्ष दिले पाहीजे असे उपेक्षित होते. पण आता देशाचा विकास, प्रगती साधायचे असेल तर महिलांनी चूल आणि मूलासोबत देश आणि विदेश याकडेसुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणातून संधी उपलब्ध करून देणे हे सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे. देशाच्या शाश्वत विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी सर्वांसाठी गुणवत्ता शिक्षण, लिंग समानता अनेक धोरणे राबवून स्त्रियांना नोकरीची संधी उपलब्ध करणे सबलीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

निष्कर्ष :

महिला सक्षमीकरण म्हणजे भारतातील गरिबी दूर करण्याचा उपाय आहे. जेव्हा महिला सशक्त होतात तेव्हा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक घटकाचा योग्य वापर करतात हे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– I (a) Jan – Feb, 2025

OPEN ACCESS Original Research Article

राष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. महिलांना वैचारिक स्वातंत्र्य मिळते आणि ती सक्षम बनते. अंधश्रद्धा, निरक्षरता, आर्थिक मागासलेपणा व लिंगभेदाची भावना महिला सबलीकरणास अडचण ठरत आहे. त्यामध्ये बदल करणे आणि महिलांना सक्षम बनविणे गरजेचे आहे. कारण एक स्त्री सुशिक्षीत असेल तर आपले कुटूंब सुधारू शकते आणि आर्थिक सामाजिक कार्यभार सांभाळू शकते. महिला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेत कलम 14, 15, 16, 39 अ, 39 क, 42 या घटनात्मक तरतुदीच्या साहाय्याने महिला सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. 2005-06 मध्ये केंद्रिय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी लिंगभेदावरील अर्थसंकल्प Gender Budget सादर करून महिला सबलीकरणास प्राधान्य दिले.

संदर्भसूची :

1) महिला सशक्तीकरण : कृष्णचंद्र चौधरी, सुचना प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

2) स्त्री विमर्श - भारतीय परिप्रेक्ष्य : डॉ. के. एम. मालती, वणी प्रकाशन, दिल्ली, 2012.

3) महिला सशक्तीकरण : इंद्रराज सिंह, डायमंड प्रकाशन

4) हिंदूस्तान टाईम्स, महिला सक्षमीकरण निर्देशांक

5) National Sample Survey 68, Journal July, 2011, June 2012.

6) आर. एस. साळुंके, जी. पी. गावडे, भारतातील महिला साक्षरता आणि सक्षमीकरण.

7)https://www.jetir.org/papers/JETIRDK06036.pdf

8) https://www.artofliving.org/in-mr/project/women-empowerment

Cite This Article:

प्रा. डॉ. देवनाळकर एस. एस. व माने ल. रं. (2025). **महिला सबलीकरण व महिलांची सद्यस्थिती. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal:** Vol. XIV (Number I, pp. 52–55). Doi: https://doi.org/10.5281/zenodo.16445321